मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील स्थान निश्चयन
धोरण रद्द करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. आयएलपी-२०१३/प्र.क्र. ११६/उद्योग-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० जून, २०१५

संदर्भ :

१) शासन परिपत्रक क्रमांकआयडीएन/१०७४/९३३९८२/नियोजन, दि.२६ डिसेंबर, १९७४
२) शासन निर्णय क्रमांक. आयएलपी-१०८२/(१७८६)/उद्योग-२, दि. ०३ फेब्रुवारी, १९८४
३) शासन निर्णय क्रमांक. आययएलपी-१०९१/(३६१६)/उद्योग-२, दि. २९ ऑक्टोबर, १९९१
४) शासन निर्णय क्रमांक. आयएलपी-१०९२/(३६८१)/उद्योग-२, दि.०२ मे, १९९२
५) शासन निर्णय क्रमांक. आयएलपी-१०९२/(३४१०)/उद्योग-२, दि. ०४ मे, १९९३
६) शासन निर्णय क्रमांक. आयएलपी-१०९५/(४४१०)/उद्योग-२, दि. २५ मे, १९९८
७) शासन निर्णय क्रमांक. आयएलपी-१०९८/(४७८९)/उद्योग-२,दि. ०७ नोव्हेंबर, १९९८

प्रस्तावना :

मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्राचा क्षेत्रीय आराखडा १९७०-९१ हा ऑगस्ट १९७३ पासून अंमलात आला. मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रात विविध प्रकारच्या उद्योग घटकांचे स्थान निश्चितीकरण कसे राहील याबाबतचे धोरण या आराखडयानुसार जाहीर करण्यात आले. त्यानुसार शासन परिपत्रक क्र. आयडीएन -१०७४/९३३९८२/योजना, दिनांक २६ डिसेंबर १९७४ मध्ये स्थान निश्चयन धोरण जाहीर झाले. सदर धोरण राबविताना येणाऱ्या अडचणी विचारात घेवून धोरणात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. अशा प्रकारची शेवटची सुधारणा दि. ७ नोव्हेंबर १९९८ ला करण्यात आली.

औद्योगिक स्थान निश्चयन धोरण कालबाह्य झाल्यामुळे विद्यमान औद्योगिक स्थान निश्चयन धोरण रद्द करुन उद्योग / उपक्रमाच्या स्थान निश्चयनाबाबतची तरतूद संबंधीत नियोजन प्राधिकरणाकडून अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या संबंधीत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता, मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील औद्योगिक स्थान निश्चयन धोरण रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील विद्यमान औद्योगिक स्थान निश्चयन धोरण कालबाह्य झाल्यामुळे सदर धोरण -रद्द- करण्यात येत आहे. तसेच वरील संदर्भित शासन निर्णय / परिपत्रके यांची अंमलबजावणी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून रद्दबातल करण्यात येत आहे.

२. मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रातील संबंधित नियोजन प्राधिकरणांनी त्यांचे क्षेत्रात अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये उद्योगाच्या स्थान निश्चयनाबाबत योग्य ती तरतूद करण्यात यावी.

३. हा शासन निर्णय मंत्रीमंडळाच्या दिनांक ०२/०६/२०१५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६१८१६४६५००८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Shamkant Degaonkar

Digitally signed by Sanjay Shamkant Degaonkar
DN: CN = Sanjay Shamkant Degaonkar, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Industry Energy And Labour Department
Date: 2015.06.23 16:10:22 +05'30'

( संजय देगांवकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
२) महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव
३) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मंत्र्याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-१), मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सी-१४,१५ वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
१८) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
२०) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

२१) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

२२) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधार कंपनी मर्यादित, प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

२३) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी मर्यादित, प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

२४) आयुक्त, ठाणे / कल्याण-डोंबिवली /भिवंडी-निजामपूर/उल्हासनगर/ मिरा-भाईंदर/ वसई-विरार शहर/ नवी मुंबई/ महानगरपालिका

२५) कामगार आयुक्त, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

२६) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

२७) अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई.

२८) जिल्हाधिकारी, मुंबई / उपनगर /रायगड / ठाणे/पालघर

२९) व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम लि. मुंबई.

३०) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल, नरीमन पॉईन्ट, मुंबई.

३१) व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ, मुंबई.

३२) संचालक नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे

३३) सह संचालक नगर रचना, कोकण विभाग

३४) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईन्ट, २, ३, व ४ था मजला, सिने प्लॅनेट सिनेमा, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.

३५) मुख्यधिकारी, अंबरनाथ/ बदलापूर/ खोपोली/ पेण/पनवेल/ उरण/ माथेरान / कर्जत / अलिबाग

३६) उद्योग ऊर्जा व कामगार विभागातील सर्व अधिकारी, मंत्रालय, मुंबई.

३७) निवडनस्ती / उद्योग-२